**<u>ठळक बातम्या</u>**

- सरकारनं गेल्या १० वर्षात महिला सक्षमीकरणासाठी अनेक अभूतपूर्व पावलं उचलली असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आजही दिवसभरासाठी तहकूब

- महाराष्ट्रात, महायुती सरकारवरचा विश्वासदर्शक ठराव विधानसभेत मंजूर, विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची बिनविरोध निवड

- रिझर्व्ह बँकेचे पुढचे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांची नियुक्ती

- पृथ्वीवरची ७७ टक्के जमीन शुष्क झाली असल्याचा संयुक्त राष्ट्रांचा अहवाल /शेती, जलस्त्रोत आणि जैवविविधतेला धोका पोहोचण्याची शक्यता

**आणि**

- राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांमधे महाराष्ट्राला ६ पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

आपल्या सरकारनं गेल्या १० वर्षांमध्ये महिला सक्षमीकरणासाठी अनेक अभूतपूर्व पावलं उचलली असून यापुढेही महिलांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून दिल्या जातील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. ते हरियाणामधे पानिपत इथे बीमा सखी योजनेचा प्रारंभ करताना बोलत होते.

हरियाणानं ज्या पद्धतीनं एक है तो सेफ है हा मंत्र स्वीकारला आहे, हे इतर राज्यांसाठी उत्तम उदाहरण असल्याचं ते म्हणाले.

महिलांमध्ये आर्थिक साक्षरता तसंच विम्याविषयीची जागरूकता वाढावी, यादृष्टीनं ही योजना तयार केली आहे. आयुर्विमा महामंडळाच्या मदतीनं राबवल्या जाणाऱ्या या योजनेत  १८ ते ७० या वयोगटातल्या किमान दहावी पास महिलांना विशेष प्रशिक्षण, आणि पहिल्या तीन वर्षांमध्ये छात्रवृत्ती दिली जाईल.

या योजनेअंतर्गत येत्या तीन वर्षात दोन लाख महिलांची भरती करण्याचं उद्दिष्ट असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

भारतात येणाऱ्या काळात तरुणांची संख्या सर्वात जास्त असणार असून या तरूणांच्या कौशल्यविकासावर शासन भर देत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. राजस्थानमध्ये जयपूर इथं होत असलेल्या रायझिंग राजस्थान या वैश्विक गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते संबोधित करत होते. तंत्रज्ञान आणि इंटरनेटच्या साहाय्यानं लोकशाही, लोकसंख्याशास्त्र आणि डेटा पॉवर या क्षेत्रांमध्ये भारताची ताकत सध्या वाढली आहे. तसंच गेल्या दहा वर्षात भारत जगातली पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनली असून भारताच्या एफडीआय आणि निर्यात क्षेत्रामध्ये दुपटीनं वाढ झाली आहे, असंही ते यावेळी म्हणाले.

<><><><><>

अदानी लाचखोरी प्रकरणासह विविध मुद्द्यांवरून आजही संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेत काँग्रेस, द्रमुकसह अन्य विरोधी पक्ष सदस्यांनी अदानी लाचखोरी  प्रकरणात घोषणाबाजी केली. सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांना कामकाज सुरू ठेवण्याची विनंती केली. मात्र तरीही गोंधळ सुरूच राहिल्याने लोकसभेचं कामकाज आधी तीन वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं.

राज्यसभेत भाजपा नेते जे. पी. नड्डा यांनी काँग्रेसवर राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आणल्याचा आणि देशात अस्थिरता असल्याची अफवा पसरवल्याचा आरोप केला. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांचे अमेरिकेतल्या जॉर्ज सोरोस फाऊंडेशनशी संबंध असल्याचा आरोपही त्यांनी केला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी या आरोपांचं खंडन केलं आणि भाजपा देशद्रोही असल्याचा प्रत्यारोप केला. त्यामुळे गदारोळ झाल्यानं राज्यसभेचं कामकाजही दिवसभरासाठी तहकूब झालं.

<><><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा विश्वासदर्शक ठराव आज विधानसभेत आवाजी मतदानानं मंजूर झाला. विधानसभा सदस्य उदय सामंत, दिलीप वळसे पाटील, संजय कुटे आणि रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमडळावर विश्वास दर्शवणारा ठराव सभागृहात मांडला होता, तो सभागृहाने आवाजी मतदानानं मंजूर केला.

<><><><><>

महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची आज बिनविरोध निवड झाली. हंगामी अध्यक्ष कालीदास कोळंबकर यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी अध्यक्षपदासाठी नार्वेकर यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला होता, त्यांच्याविरोधात अन्य कोणीही उमेदवार नसल्याने हा प्रस्ताव सभागृहाने आवाजी मतदानानं मंजूर केला.

<><><><><>

राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीला संबोधित केलं. महाराष्ट्र उद्योगात अग्रेसर असून २०२३-२४

साली राज्यात सर्वाधिक थेट परकीय गुंतवणूक आल्याचं राज्यपालांनी यावेळी सांगितलं. गेल्या आठ महिन्यात तीन लाख कोटींहून अधिक गुंतवणूक झाली असून यामुळे एक लाख १८ हजार रोजगार निर्माण होणार आहेत असं राज्यपाल म्हणाले.

<><><><><>

बहुउद्देशीय क्षेपणास्त्रवाहू जहाज आय एन एस तुशील चा संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत आज भारतीय नौदलात समावेश करण्यात आला. रशियाच्या यंतार बंदरात झालेल्या या समारंभात भारतीय नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी उपस्थित होते. आय एन एस तुशील, ब्राम्होससह अनेक अत्याधुनिक क्षेपणास्त्रांनी सज्ज असून अतिदूरच्या सागरात जगभरात कुठेही कार्यरत राहू शकतं. या जहाजाच्या बांधणीत भारत आणि रशिया या दोन्ही देशातील तंत्रज्ञांचा हातभार लागला असून हे जहाज दोन्ही देशांच्या दीर्घ मैत्रीच्या प्रवासातला एक महत्वाचा टप्पा दर्शवत असल्याचं यावेळी राजनाथ सिंग यांनी सांगितलं.

<><><><><>

झारखंड विधानसभेचं चार दिवसीय विशेष अधिवेशन आजपासून सुरु झालं. अधिवेशनाच्या आजच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यासह सर्व नवनिर्वाचित सदस्यांचं शपथग्रहण पार पडलं. नव्या विधानसभा अध्यक्षांची निवडणूक उद्या घेतली जाईल. त्यानंतर हेमंत सोरेन सरकारच्या विश्वासदर्शक ठरावावर मतदान होईल. राज्यपाल संतोष कुमार गंगवार बुधवारी सदनाला संबोधित करतील आणि मग राज्याचा चालू आर्थिक वर्षासाठीचा दुसरा पुरवणी अर्थसंकल्प सदनात सादर केला जाईल.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेचे पुढचे गव्हर्नर म्हणून संजय मल्होत्रा यांची नियुक्ती केंद्र सरकारनं केली आहे. सध्याचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ उद्या संपणार

आहे. त्यानंतर ११ डिसेंबरला संजय मल्होत्रा पदभार स्वीकारतील. त्यांना तीन वर्षांचा कार्यकाळ मिळेल.

१९९०च्या राजस्थान कॅडरचे भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी असलेले संजय मल्होत्रा सध्या अर्थमंत्रालयात महसूल सचिव पदावर काम करत आहेत.

**<><><><>**

गेल्या ३० वर्षांमध्ये पृथ्वीवरची सुमारे ७७ टक्के जमीन लक्षणीय रित्या कोरडी  झाली आहे, असं संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालात म्हटलं आहे. यामुळे जगभरातली शेती, जलस्त्रोत आणि जैव विविधता यांना मोठा धोका पोहोचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. १९९० ते २०१५ या कालावधीत वाढलेल्या शुष्कतेमुळे आफ्रिकेनं आपला १२ टक्के जी डी पी गमावला असल्याचंही या अहवालात नमूद करण्यात आलं असून येत्या पाच वर्षांत आफ्रिका सुमारे १६ टक्के तर आशिया सुमारे ७ टक्के जीडीपी  गमावून बसेल, अशी भीतीही यात व्यक्त करण्यात आली आहे.

वाळवंटीकरण आणि हवामान बदल या समस्यांचा सामना करण्यासाठी जल व्यवस्थापनाच्या नाविन्यपूर्ण पद्धती तसंच शाश्वत जमीन वापर यांचा अवलंब करण्याची निकड निर्माण झाली आहे, असं मत वैज्ञानिक आणि पर्यावरणवादी यांनी व्यक्त केलं आहे.

**<><><><>**

केंद्रीय पंचायत राज मंत्रालयानं २०२२-२३ या वर्षाकरता राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांसाठी देशभरातून विविध श्रेणींमध्ये ४५ पुरस्कार विजेत्यांची निवड जाहीर केली आहे. त्यात महाराष्ट्राला ६ पुरस्कार मिळाले आहेत.

यामध्ये  सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीनं नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत

सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार, तसंच ग्राम उर्जा स्वराज विशेष ग्राम पंचायत अशा दोन पुरस्कारांवर आपलं नाव कोरलं.

गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गटाला नानाजी देशमुख सर्वोत्तम पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत सर्वोत्तम पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी गट अंतर्गत मोडाळे ग्रामपंचायतीला दीनदयाळ उपाध्याय पंचायत सतत विकास पुरस्कार श्रेणीत स्वच्छ आणि हरित ग्राम पंचायत हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे

भंडारा जिल्ह्यातल्या बेला ग्रामपंचायतीनं कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत श्रेणीत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे.

तर पुण्यातल्या यशदा, अर्थात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी या संस्थेला पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था श्रेणीत तृतीय क्रमांचाचा पुरस्कार मिळाला आहे. येत्या बुधवारी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान केले जातील.

<><><><><>

मुंबईतल्या प्रा. एल.एन. वेलिंगकर व्यवस्थापन विकास आणि संशोधन संस्थेमध्ये येत्या ११ आणि १२ डिसेंबर २०२४ रोजी 'स्मार्ट इंडिया हॅकथॉन' या राष्ट्रीय स्तरावरील महाअंतिम फेरीचं आयोजन केलं आहे. शिक्षण मंत्रालय आणि भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधानमंत्री कार्यालयानं हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

पुण्यामध्ये राष्ट्रीय स्मार्ट इंडिया हॅकेथॉन-२०२४ स्पर्धेच्या हार्डवेअर गटाच्या अंतिम फेरीची सुरूवातही येत्या ११ डिसेंबरला एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठात होणार आहे. ही स्पर्धा ११ ते १५ डिसेंबर दरम्यान

होणार असून देशभरातून २७ संघ, १६८ स्पर्धक आणि ३२ मार्गदर्शक सहभागी होतील.

**<><><><><>**

दिल्लीच्या शंभू सीमेवर सुरु असलेल्या शेतकरी आंदोलनासंबंधी नवी याचिका दाखल करून घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. यासंबंधात न्यायालयात आधीच याचिका प्रलंबित असल्याने त्याच मुद्द्यावर नवी याचिका न्यायालय स्वीकारणार नाही, असं न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं सांगितलं.

**//<><><><><>//**